॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


* सुविचार *

जो काळानुसार बदलला,
त्यानेच जीवनात प्रगती केली.

# स्वातंत्र्यदिनापासून क्यूआर कोड आधारित रेशनिंग

## केसरी आणि पिवळा कार्ड धारकांना मिळणार स्मार्ट शिधापत्रिका । गडचिरोली व सिंधुदुर्ग जिल्ह्यातून होणार शुभारंभ

● **मुंबई । वीरभूमी –** राज्यातील नागरिकांना अधिक सुरक्षित, सुलभ आणि आधुनिक स्वरूपातील शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका वितरणाचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. १५ ऑगस्ट पासून शिधापत्रिका वितरण मोहीमेला सुरुवात होणार आहे. राज्यातील सुमारे १ कोटी ८६ लाख कुटुंबांना स्मार्ट शिधापत्रिका वितरित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. केवळ केसरी आणि पिवळा शिधापत्रिका धारकांना पहिल्यांदा या स्मार्ट शिधापत्रिका देण्यात येणार असून त्याचा शुभारंभ गडचिरोली व सिंधुदुर्ग जिल्हयातून होणार आहे.

राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर गडचिरोली आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. प्रायोगिक टप्प्यातील अनुभवाच्या आधारे आवश्यक सुधारणा करून पुढील टप्प्यांमध्ये संपूर्ण राज्यात ही योजना राबवली जाणार आहे. गेली अनेक वर्षे वापरात असलेल्या कागदी शिधापत्रिका फाटणे, खराब होणे किंवा



हरविणे यांसारख्या समस्यांमुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर क्यूआर कोड असलेल्या स्मार्ट शिधापत्रिकांमुळे लाभार्थ्यांची माहिती अधिक सुरक्षित, अद्ययावत आणि सहज उपलब्ध राहणार आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीतील पारदर्शकता आणि कार्यक्षमतेतही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच एपीएल शेतकरी योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांना स्मार्ट शिधापत्रिका नि:शुल्क उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्यातील एकूण सुमारे सात कोटी शिधापत्रिकाधारकांपैकी मोठा लाभार्थी वर्ग या उपक्रमाचा लाभ घेणार आहे. यामध्ये एक कोटी ८६ लाख शिधापत्रिका ह्या पिवळ्या व केसरी रंगाच्या आहेत. यात अंत्योदय अन्न योजनेचे २५ लाख शिधापत्रिका धारक आहेत तर एक कोटी ६१ लाख शिधापत्रिकाधारक हे प्राधान्य कुटुंब योजनेतील आहेत. सफेद रंगाच्या शिधापत्रिका धारका तूर्त स्मार्ट कार्ड दिले जाणार नाहीत. हा वर्ग मध्यम तसेच उच्च उत्पन्न वर्गातील आहे.

### चेहरा पडताळणी प्रक्रिया राबवली जाणार

■ स्मार्ट शिधापत्रिका तयार करण्यासाठी लाभार्थ्यांचे आधार क्रमांकाशी संलग्नीकरण करण्यात येणार आहे. चेहरा पडताळणी प्रक्रिया राबवली जाणार आहे. लाभार्थ्यांची अचूक ओळख पटविणे आणि अपात्र लाभार्थ्यांना आळा घालणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाची संकल्पना स्वर्गीय अजितदादा पवार यांनी पुढे मांडली होती.. गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांना जुन्या शिधापत्रिकांमुळे होणारा त्रास लक्षात घेऊन आधुनिक, टिकाऊ आणि सुरक्षित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याचा त्यांचा संकल्प आता प्रत्यक्षात साकार होत आहे. शासनाने ही मोहीम १५ ऑगस्टपासून सुरू करून २६ जानेवारीपर्यंत राज्यभर टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

## SPOT NEWS

### राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचा ज्युदोमध्ये डबल धमाका

● **नवी दिल्ली –** राष्ट्रकुल स्पर्धा २०२६ च्या अंतिम टप्प्यात भारताच्या खात्यात आणखी २ सुवर्णपदकांची भर पडली. विशेष म्हणजे भारताने प्रथमच ज्युदो क्रीडा प्रकारात गोल्ड मेडल पटकावले. भारताच्या अस्मिता डेने ४८ किलो वजन गटात तर हर्ष सिंहने ६० किलो वजनी गटात सुवर्ण पदकाची कमाई केली. भारताच्या अस्मिता डेने ४८ किलो वजनी गटात सुवर्ण पदकाला गवसणी घातली. अंतिम सामन्यात तिने कॅनडाच्या हेडी क्कॉकला पराभवाची धूळ चारली तर हर्ष सिंहने ६० किलो वजनी गटात ऑस्ट्रेलियाच्या जोशुआ कॅट्जला पराभूत करीत सुवर्ण पदकाची कमाई केली. या सामन्यात त्याने १०-१ ने विजय मिळवला. भारताला दोन्ही सुवर्ण पदके २० मिनिटांच्या अंतराने मिळाली. ज्युदो स्पर्धेत हर्षने फायनल गाठण्यापूर्वी सुरुवातीपासूनच स्पर्धेत आपले निर्विवाद वर्चस्व राखले. फायनलमध्ये हर्षचा सामना ऑस्ट्रेलियाच्या ऑलिम्पियन ज्युदोपटू जोशुआ काट्झ याच्याशी झाला. हर्षने हा सामना १०-० अशा फरकाने जिंकून भारताच्या झोळीत सुवर्णपदक टाकले. दुसरीकडे अस्मिता डेने अंतिम सामन्यात कॅनडाच्या हेडी क्काकशी लढत दिली. अटीतटीच्या लढतीत सामना 'गोल्डन स्कोअर'मध्ये गेला, जिथे अस्मिताने कॅनडाच्या खेळाडूला २-१ ने पराभूत करत भारतासाठी ऐतिहासिक सुवर्ण पदक जिंकले आणि भारताला आज दुहेरी लाभ झाला.

### आता मालगाडीही १४५ किमी प्रति तास वेगाने धावणार

● **नवी दिल्ली –** भारतीय रेल्वेने एक ऐतिहासिक कामगिरी करून दाखवली आहे. वंदे भारत कार्गो ट्रेनच्या वेगाची चाचणी यशस्वी झाली आहे. वंदे भारत कार्गो ट्रेन आता प्रवासी ट्रेनप्रमाणे १४५ किमी प्रति तास वेगाने धावण्यास सक्षम आणि सज्ज झालेली आहे. यामुळे मालवाहतुकीत एक नवीन अध्याय प्रारंभ होऊ शकतो, असा कयास बांधला जात आहे. वंदे भारत चेअर कार, वंदे भारत स्लीपर ट्रेन, वंदे भारत मेट्रो यानंतर आता वंदे भारत या संकल्पनेवर तयार करण्यात आलेली वंदे भारत कार्गो ही मालवाहतुकीसाठी विशेष करून तयार करण्यात आलेली ट्रेन लवकरच सेवेत येऊ शकते, अशी शक्यता आहे. देशातील विविध भागात या ट्रेनची चाचणी सुरू आहे. या चाचणीवेळी वंदे भारत कार्गो ट्रेनने ताशी १४५ किलोमीटरचा कमाल वेग गाठला.

## निम्म्या लोकांना प्रमाणपत्र वाटप : मंत्री विखे पाटील

● **मुंबई । वीरभूमी–** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेत २९ ऑगस्टपासून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मराठा समाजाला वेड्यात काढण्याचे काम सरकार करत असून आता आरपारची लढाई लढण्याची वेळ आली आहे अशा शब्दांत जरांगे यांनी इशारा दिला. तसेच २९ ऑगस्टपासून पुन्हा एकदा राज्यव्यापी आणि शेवटचे निर्णायक आंदोलन करण्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली. त्यांच्या या घोषणेवर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिक्रिया देत मनोज जरांगे यांनी केलेल्या कोणत्या मागण्या आतापर्यंत मान्य झाल्या आहेत, याची यादीच वाचून दाखवली.



मराठा समाजाच्या आरक्षणाची वाटचाल आपण पाहिली तर पहिल्यांदा २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मागासवर्ग आयोगाची स्थापना करून आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यानंतर हा विषय सर्वोच्च न्यायालयात गेला आणि तो निर्णय रद्द झाला. त्यामुळे समाजाचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर पुन्हा महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर उपसमितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्याकडे दिली, त्या माध्यमातून अनेक मोठे निर्णय घेतले आहेत असे राधाकृष्ण विखे पाटलांनी सांगितले.

न्यायमूर्ती शिंदे समितीने राज्यभरातील ५८ लाख नोंदी शोधल्या. त्यापैकी जवळपास ५० टक्के लोकांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली, तसेच ही प्रक्रिया सध्या देखील सुरू आहे. हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याची मनोज जरांगेंची मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्य केलेली आहे. त्यावर कारवाईदेखील सुरू करण्यात आलेली आहे. तसेच आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना मदत देण्याच्या मागणीची पूर्तता झालेली आहे. तसेच मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना नोकरी देण्याचा निर्णय देखील झालेला आहे असे सांगत राधाकृष्ण विखे पाटलांनी आतापर्यंत सरकारने घेतलेल्या निर्णयाची यादीच सांगितली.

## अकोलेच्या नगराध्यक्षपदी सोनाली नाईकवाडी

### भाजपमधील अंतर्गत लढतीत ११ मते मिळवत विजय

● **अकोले । वीरभूमी –** अकोले नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत सौ. सोनाली लक्ष्मीकांत नाईकवाडी यांची नगराध्यक्षपदी निवड झाली. माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विजय उंडे यांनी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार शुक्रवारी (दि. ३१) ही निवडणूक पार पडली.

भाजपमधील अंतर्गत लढतीत सौ. सोनाली नाईकवाडी आणि सौ. वैष्णवी सोमेश्वर धुमाळ यांचे उमेदवारी अर्ज वैध ठरल्यानंतर निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती. मतदानात सोनाली नाईकवाडी यांना १७ पैकी ११



मते मिळाली, तर वैष्णवी धुमाळ यांना ६ मते मिळाली.

ही निवडणूक माजी आमदार वैभवराव पिचड यांच्यासाठी प्रतिष्ठेची मानली जात होती. त्यांनी भाजपच्या अधिकृत उमेदवार म्हणून वैष्णवी धुमाळ यांना पाठिंबा दिल्याचे जाहीर केले होते. मात्र, भाजपच्या काही नगरसेवकांनी पक्षाच्या भूमिकेपासून वेगळी भूमिका घेत सोनाली नाईकवाडी यांना मतदान केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

सोनाली नाईकवाडी यांना मतदान करणाऱ्या भाजपच्या सात नगरसेवकांवर पक्षाकडून शिस्तभंगाची कारवाई होणार का, याबाबत चर्चा सुरू आहे. दरम्यान, संबंधित नगरसेवकांनी आपण भाजपमध्येच असून नगरपंचायतीवर भाजपचाच झेंडा फडकला असल्याची भूमिका घेतल्याचे समजते.

नगराध्यक्षपदाची निवडणूक पार पडताच आता उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून त्यासाठीही चुरशीची लढत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

सौ. सोनाली नाईकवाडी यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# जंतर-मंतर आंदोलकांवरील गुन्हे मागे? भरकटलेल्या मुलांना शिक्षा नाही, मार्गदर्शन हवे

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भावनिक आवाहन । विशेष व्हिडिओ संदेशात दिला उपदेश

● **नवी दिल्ली । वीरभूमी –** दिल्लीतील जंतर-मंतर येथे पार पडलेल्या आंदोलनादरम्यान पंतप्रधानांविरोधात अश्लील आणि अक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या तरुण आंदोलकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे माफ केले आहे. शुक्रवारी उशिरा रात्री प्रसिद्ध केलेल्या एका विशेष व्हिडिओ संदेशात पंतप्रधानांनी भावनिक साद घालत लहानपणात चुका होतात आणि चुकांमधून शिकण्याची संधीही असते असे प्रतिपादन केले. कायदेशीर कारवाया, न्यायालयाच्या फेऱ्या किंवा सामाजिक दडपणाने परिस्थिती सुधारणार नाही, तर या भरकटलेल्या तरुणांना आपलंसं करून योग्य मार्ग दाखवणे हे समाजाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

जंतर-मंतरवर घडलेल्या प्रकाराबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले की, काही खोडकर मुलांनी अत्यंत खालच्या पातळीची भाषा वापरली आणि कोणत्याही सभ्य समाजाला न शोभणारे शब्द वापरले गेले. मला तर शिव्या दिल्याच, पण माझ्या स्वर्गीय आईलाही सोडले नाही, हे अत्यंत दुःखद होते. मात्र लहानपण हे चुकांचे आणि त्यातून शिकण्याचे वय असल्याने मी त्यांना मनापासून माफ करत आहे. आपल्या घरातील मुला-मुलींनी अशा प्रकारची भाषा वापरणे हा एक मोठा सांस्कृतिक धक्का आहे, असे सांगतानाच पंतप्रधानांनी समाजाला शांत राहण्याचे आणि



या तरुणांना योग्य दिशा दाखवण्याचे आवाहन केले.

आपल्या भूमिकेचे समर्थन करताना पंतप्रधानांनी एक व्यावहारिक दाखला दिला. जेवताना कधी-कधी स्वतःच्याच दातांखाली आपली जीभ येते आणि रक्त येते, पण म्हणून आपण दात तोडून टाकत नाही. कारण दातही आपलेच असतात आणि जीभही आपलीच असते. ही मुलेदेखील आपलीच आहेत आणि त्यांना शिक्षा देऊन न्यायालयाच्या फेऱ्या मारायला लावण्यापेक्षा योग्य रस्ता दाखवणे हे कठीण असले तरी आपलेच काम आहे.

पंतप्रधानांनी आंदोलक तरुणांना थेट उद्देशून एकत्र येण्याचे आवाहन केले. देशासाठी एकत्र मिळून पुढे जाऊया, चुकांमधून शिकूया आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करूया, असा संदेश त्यांनी दिला. देश वेगाने पुढे जात आहे आणि तुमच्या भविष्यासाठीच मी अहोरात्र कष्ट करत आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पेपरफुटी व शैक्षणिक मुद्द्यांवरून जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान काही आंदोलकांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यामध्ये पंतप्रधान मोदी व त्यांच्या दिवंगत मातोश्रींबद्दल अनुचित शब्द वापरल्याचे दिसून आले होते, ज्यानंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त होत होता. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी एफआयआर नोंदवून कायदेशीर पावले उचलण्यास सुरुवात केली होती. मात्र, पंतप्रधान मोदींच्या या व्हिडिओ संदेशानंतर या प्रकरणाला अत्यंत वेगळे आणि सकारात्मक वळण मिळाले आहे.

# SPOT NEWS

## एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या ५० व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेने रचला इतिहास

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचार, गणितीय कौशल्य आणि बौद्धिक क्षमता विकसित करणे ही काळाची गरज आहे. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीने गेल्या ४३ वर्षांपासून अबॅकसच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये गणिताची गोडी निर्माण केली आहे. ५०व्या राष्ट्रीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन ही केवळ स्पर्धा नसून भारतीय शैक्षणिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी चळवळ आहे. अकॅडमीने जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर अभिमानाने उंचावले आहे.असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या ५० व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी श्री खताळ बोलत होते. यावेळी खझड परीक्षा उत्तीर्ण कु. ऋतुजा गायकवाड, अधिव्याख्याता डॉ. गणेश मोरे, पोलीस उपनिरीक्षक विद्या झाडे,ड. मिनल देशमुख, केंद्रप्रमुख आशा घुले, विश्वनाथ खिल्लारी, रोहिणी खतोडे, मुख्याध्यापक गायकवाड, सुनीता वाकचौरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन आणि अबॅकस मण्यांच्या पवित्र पाटीच्या पूजनाने झाली. त्यानंतर सर्व मान्यवरांचा अकॅडमीच्या वतीने सन्मान करण्यात आला. वंदना थोरात यांनी स्वागत व प्रास्ताविकातून एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीचा ४३ वर्षांचा प्रेरणादायी शैक्षणिक प्रवास, विद्यार्थी घडविण्याची परंपरा आणि राष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय यशाचा आढावा मांडला. या प्रसंगी डॉ.सौ.कल्पना कार्ले यांचा विशेष गौरव करण्यात आला. एव्हरेस्ट आदर्श शिक्षिका पुरस्काराने रोहिणी शिंदे व वैशाली साळुंखे, एव्हरेस्ट स्टार टीचर अवॉर्डने ननिका थोरात, रायझिंग वुमन स्टार अवॉर्डने विद्या देशमुख, तर एव्हरेस्ट गॅलेक्सी टीचर अवॉर्डने वंदना थोरात यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## निमज येथील महादेव मंदिरातील शिवपिंडीवरील दुर्मीळ शिलालेखातून
# उलगडला अठराव्या शतकातील शैव भक्तीचा इतिहास




■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
संगमनेर तालुक्यातील प्रवरा नदीच्या तीरावर वसलेल्या निमज गावातील प्राचीन महादेव मंदिरात शिवपिंडीवर कोरलेला अठराव्या शतकातील महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आला आहे. शालिवाहन शक १६८७ (दि. १५ एप्रिल १७६५, सोमवार) मधील हा शिलालेख महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक आणि स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत मौल्यवान प्राथमिक ऐतिहासिक पुरावा ठरत आहे.

हा शिलालेख महादेव मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यातील शिवपिंडीच्या खालच्या भागावर कोरलेला आहे. चार ओळींचा हा कोरीव लेख देवनागरी लिपीत मराठी भाषेत असून, सतत होणाऱ्या जलाभिषेकामुळे अनेक अक्षरे झिजून पुसट झाली आहेत. काही अक्षरे तुटली असली तरी खडूचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर वाचण्यात यश आले.

शिलालेखाचे वाचन

१. ।।श्री म।।स।। १६८७ ।।

२. ।। पा. । चैत्र वद्य १० राजे ।।३. ।। स्री वनजि बाबाजी४. ।।मतकर सिवभक्त ।।

या शिलालेखानुसार शालिवाहन शक १६८७, पार्थिव नाम संवत्सर, चैत्र वद्य १० अर्थात सोमवार, दि. १५ एप्रिल १७६५ रोजी राजेश्री वनाजी बाबाजी मतकर या शिवभक्त व्यक्तीने शिवलिंगाची स्थापना अथवा शिवपिंडी अर्पण केल्याची नोंद करण्यात आली आहे. शिवभक्त हा उल्लेख त्यांच्या भगवान शिवावरील निष्ठेचा स्पष्ट पुरावा मानला जातो.

इतिहास संशोधनाच्या दृष्टीने हा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. यात स्पष्ट कालनोंद असल्यामुळे शिलालेखाचा काळ निश्चित करता येतो. तसेच वनाजी बाबाजी मतकर या व्यक्तीचा उल्लेख असल्याने त्या काळातील व्यक्तिनामे, घराणी, आडनावे आणि स्थानिक समाजरचनेच्या अभ्यासाला महत्त्वपूर्ण दिशा मिळते.

मतकर या आडनावाच्या आधारे संबंधित कुटुंबाचा स्थानिक इतिहास, वंशावळ आणि सामाजिक स्थानाचा शोध घेणे शक्य होते. अठराव्या शतकात महाराष्ट्रात शैव परंपरेला मोठे महत्त्व होते. शिवमंदिरे, शिवलिंगांची स्थापना, देवस्थानांना दान आणि धार्मिक बांधकामांच्या नोंदी अशा शिलालेखांतून सातत्याने दिसून येतात. त्यामुळे निमज येथील हा शिलालेख त्या काळातील शैव भक्ती परंपरेचा महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून समोर येतो.

हा शिलालेख मंदिर, समाधी किंवा इतर धार्मिक स्मारकाशी संबंधित असण्याची शक्यता संशोधकांनी व्यक्त केली आहे. अशा शिलालेखांचा उद्देश केवळ व्यक्तीचे नाव नोंदविणे नसून, त्या व्यक्तीचे धार्मिक कार्य, श्रद्धा आणि सामाजिक योगदान भावी पिढ्यांसाठी जतन करणे हाही असतो.

साहित्यिक उल्लेखांच्या तुलनेत शिलालेख हे समकालीन लिखित पुरावे असल्याने त्यांना इतिहास संशोधनात अधिक प्रामाणिक स्थान प्राप्त आहे. त्यामुळे निमज येथील हा शिलालेख मराठा कालखंडातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या शिलालेखाचे संशोधन, माहिती, संकलन व वाचन पुणे येथील अनिल दुधाणे यांनी केले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्वीकृत सदस्यपदी माजी सैनिकांना संधी द्या
### जय हिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे यांची मागणी । ग्रामविकास सचिवांना दिले निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
महाराष्ट्रातील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांमध्ये निवडणुकांनंतर नियुक्त करण्यात येणाऱ्या स्वीकृत सदस्यपदावर माजी सैनिकांना प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास सचिवांकडे करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्ये किमान एक स्वीकृत सदस्य म्हणून माजी सैनिकाची नियुक्ती करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे जय हिंदचे शिवाजी पालवे यांनी केली आहे.

शिवाजी पालवे यांनी याबाबत सांगितले की, देशाच्या संरक्षणासाठी आयुष्याचा महत्त्वाचा काळ सीमारेषेवर घालविणाऱ्या माजी सैनिकांचा अनुभव, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रहिताची भावना ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे त्यांना स्थानिक प्रशासनात योगदान देण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात लवकरच ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार असून, निवडणुका पार पडल्यानंतर विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाते. या नियुक्ती प्रक्रियेत देशसेवेसाठी कार्य केलेल्या माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनने केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजी सैनिक हे शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि पारदर्शक कामकाजासाठी ओळखले जातात. समाजहिताला प्राधान्य देण्याची त्यांची भूमिका आणि प्रशासनाचा अनुभव स्थानिक विकासाला गती देणारा ठरू शकतो. ग्रामविकास, सामाजिक सलोखा, सार्वजनिक शिस्त आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरू शकते.

शिवाजी पालवे यांनी पुढे सांगितले की, अनेक माजी सैनिक आपल्या गावात, तालुक्यात आणि जिल्ह्यात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेत असतात. त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांत कौतुकही केले जाते. मात्र आर्थिक परिस्थिती किंवा अन्य कारणांमुळे अनेकांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा अनुभवी आणि सेवाभावी व्यक्तींना स्वीकृत सदस्यपदाच्या माध्यमातून स्थानिक प्रशासनात संधी दिल्यास त्यांच्या अनुभवाचा थेट लाभ गावांच्या विकासासाठी होऊ शकतो.

जय हिंद फाऊंडेशनने राज्य शासनाला या मागणीचा सकारात्मक विचार करून प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्ये किमान एक स्वीकृत सदस्य म्हणून माजी सैनिकाची नियुक्ती करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती केली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये माजी सैनिकांचा सहभाग वाढल्यास विकासकामांमध्ये पारदर्शकता, शिस्त आणि जनहिताला अधिक प्राधान्य मिळेल, असा विश्वासही फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

## पाथर्डीच्या विकासकामांसाठी निधी द्या
### राष्ट्रवादी (श.प.) पदाधिकाऱ्यांची जयंत पाटील यांच्याकडे मागणी


■ छाया । अनिल खाटेर

**● पाथर्डी । वीरभूमी–**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री तथा आमदार जयंत पाटील यांच्या पाथर्डी दौऱ्यादरम्यान पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत करून शहरातील प्रलंबित विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते तथा नगरसेवक देवा पवार यांनी जयंत पाटील यांना निवेदन सादर केले. या निवेदनात पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था, सार्वजनिक सुविधा, नागरी मूलभूत सोयी-सुविधा तसेच विविध विकासकामांसाठी शासन स्तरावर विशेष निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली. तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या रखडलेल्या कामांना गती देण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी जयंत पाटील यांनी निवेदन स्वीकारून पाथर्डी शहराच्या विकाससंदर्भातील मागण्यांची सकारात्मक दखल घेत संबंधित विषयांवर आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या प्रसंगी माजी नगरसेवक बंडू बोरुडे, नगरसेवक देवा पवार, सुरेश हंडाळ, बाळासाहेब सोनटक्के, योगेश रासने, आतिष निराळी, सुमित तरवडे, अनिकेत निनगुनकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पाथर्डी शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध व्हावा आणि प्रलंबित विकासकामांना चालना मिळावी, या उद्देशाने करण्यात आलेल्या या मागणीची शहरात चर्चा होत आहे.

## शेवगावात जिल्हा परिषद मराठी मुलींच्या शाळेत
# दोन नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाचे आमदार मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते भूमिपुजन

**● शेवगाव । वीरभूमी –**
जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत शेवगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलींची शाळा (जुना कोर्ट परिसर) येथे दोन नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाचा शुभारंभ आज आमदार मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात झाला. यावेळी विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी आमदार राजळे यांचे आभार मानले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार मोनिकाताई राजळे म्हणाल्या, इतर विकासकामांच्या शुभारंभापेक्षा चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी उभारल्या जाणाऱ्या वर्गखोल्यांच्या कामाची सुरुवात करताना वेगळाच आनंद मिळतो. विद्यार्थ्यांना चांगल्या व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण काथवटे व समिती सदस्यांनी नवीन वर्गखोल्यांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी निधी मंजूर झाला असून आज प्रत्यक्ष कामास सुरुवात होत आहे.

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेचे कौतुक करताना आमदार राजळे म्हणाल्या की, प्राथमिक शिक्षक विद्यार्थ्यांना आत्मीयतेने आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत. जिल्हा परिषद शाळांमधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत असून ही बाब अभिमानास्पद आहे.

शेवगाव शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांच्या शाळेलाही नवीन वर्गखोल्यांची आवश्यकता असल्याचे सांगत, त्या शाळेसाठीही शासनामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी गटशिक्षणाधिकारी शैलजा रावळ, भाजपा तालुकाध्यक्ष महेश फलके, भाजपा महिला शहराध्यक्ष दीपाली काथवटे, नगरसेविका डॉ. गीता लांडे, आशाताई बुलबुले, सागर फडके, नितीन दहिवाळकर, कमलेश गांधी, गणेश कोरडे, भीमराज सागडे पाटील, गणेश रांधवणे, डॉ. कृष्णा देहाडराय, बाप्पू धनवडे, महिला आघाडीच्या उषाताई कंगनकर, ज्ञानेश्वर देहाडराय, माजी सरपंच सतीशराव लांडे, कैलास सोनवणे, सुरेश लांडे, शिवाजी आधाट, अमोल माने, सोमनाथ सोनवणे, राहुल वरे, सुरेश थोरात, गुरुनाथ माळवदे, शिवाजी समिंदर, संतोष कंगनकर, सोमनाथ वीर, नवनाथ अमृत,



शिक्षिका प्रांजल शिंदे, पंचायत अभियंता वावरे, ठेकेदार किशोर अडबल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नीरज लांडे यांनी केले. प्रास्ताविक शाळेच्या माजी शिक्षिका शुभांगी शेलार यांनी केले, तर आभार नामदेव धायतडक यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## लायन्स इंटरनॅशनलचे चार युवा प्रतिनिधी अहिल्यानगरात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

लायन्स इंटरनॅशनलच्या जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित इंटरनॅशनल यूथ एक्स्चेंज प्रोग्राम अंतर्गत तुर्कस्तान, बेल्जियम, डेन्मार्क आणि हंगेरी या चार देशांतील युवा प्रतिनिधी सध्या अहिल्यानगरात वास्तव्यास असून भारतीय संस्कृती, परंपरा, अध्यात्म, सामाजिक जीवन आणि कौटुंबिक मूल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत. या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमाचे यजमानपद लायन्स क्लब ऑफ अहमदनगर यांनी स्वीकारले असून, लायन्स मल्टिपल डिस्ट्रिक्टच्या यूथ एक्स्चेंज चेअरमन लायन दिपेश जोशी (मुंबई) व लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजीतसिंग वधवा यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात तुर्कस्तान (इस्तंबूल) येथील अभिनेत्री डेफ्ने एर्सेन, बेल्जियमची ईव्हा–लुना बेलॉय, डेन्मार्कचा एलियट केलर लॉरिट्झेन आणि हंगेरीचा फाबोक मॅत्यास हे चार युवा प्रतिनिधी या उपक्रमाह सहभागी होवून शहरात दाखल झाले आहेत. भारतीय संस्कृतीचा जवळून अनुभव मिळावा या उद्देशाने प्रत्येक प्रतिनिधीचा मुक्काम स्थानिक लायन्स सदस्यांच्या कुटुंबात ठेवण्यात आला आहे. डेफ्ने एर्सेन या हरजीतसिंग वधवा यांच्या कुटुंबात, ईव्हा–लुना बेलॉय या सी.ए. राजेंद्र काळे यांच्या कुटुंबात, एलियट केलर लॉरिट्झेन हे लायन सुनील छाजेड यांच्या कुटुंबात, तर फाबोक मॅत्यास हे लायन किरण भंडारी यांच्या कुटुंबात वास्तव्यास आहेत. भारतीय कुटुंबासोबत राहून ते येथील जीवनपद्धती, खाद्यसंस्कृती, सण–उत्सव आणि सामाजिक परंपरा समजून घेत आहेत.

## गर्दीत नकळत गळून पडलेले महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे दागिने केले परत

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

पैश्यापेक्षा माणुसकी आणि प्रामाणिकपणा अधिक मोठा असतो, याचा प्रत्यय केडगाव येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित महाप्रसाद सोहळ्यात आला. मोहिनी नगर येथील साई मंदिरात हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असताना एका महिलेच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण गर्दीत नकळत गळून पडले. काही वेळाने गंठण हरवल्याचे लक्षात येताच त्या महिलेने मंदिर परिसरात शोधाशोध सुरू केली. अमूल्य दागिना हरवल्याने ती भावूक झाली होती. परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. महाप्रसाद वाटपाची सेवा बजावत असलेले साईभक्त मोहन (मामा) औटी यांच्या नजरेस ते सोन्याचे गंठण पडले. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तत्काळ आयोजकांकडे जाऊन गंठण जमा केले आणि ध्वनिक्षेपकावरून ज्यांचे गंठण हरवले आहे त्यांनी ओळख पटवून ते घेऊन जावे, असे आवाहन करण्यास सांगितले. घोषणा ऐकताच संबंधित महिला धावत आली. योग्य ओळख पटविल्यानंतर मोहन औटी यांनी तिच्या हाती सुरक्षितपणे सोन्याचे गंठण सुपूर्द केले. हरवलेली अमूल्य वस्तू परत मिळाल्याच्या आनंदाने त्या महिलेच्या डोळ्यांत अश्रू तरळले. तिने मोहन औटी यांचे मनापासून आभार व्यक्त केले. मोहन औटी यांच्या प्रामाणिकपणाचे साई सेवा मंडळ तसेच केडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांच्या प्रामाणिक व सेवाभावी वृत्तीचा गौरव करण्यात आला.

# पारनेर पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारावर खड्ड्यांचे साम्राज्य

**साचलेल्या पाण्यामुळे नागरिक व वाहनचालक त्रस्त । तातडीने दुरुस्तीची मागणी**

● **पारनेर । वीरभूमी –**

तालुक्यातील प्रमुख केंद्र असलेल्या पारनेर पोलीस ठाण्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने पोलीस ठाण्यात येणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि वाहनचालकांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत असून प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त होत आहे.



■ छाया । भगवान गायकवाड

पारनेर पोलीस ठाण्यात दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी, तक्रारी नोंदविण्यासाठी आणि कायदेशीर प्रक्रियेसाठी येतात. मात्र, मुख्य प्रवेशद्वारासमोरील तसेच आवारातील खड्ड्यांमुळे ये–जा करताना मोठी कसरत करावी लागते. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नसल्यामुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत असून अपघाताचा धोका वाढला आहे.

विशेष म्हणजे, याच मार्गावरून पोलीस विभागाची शासकीय वाहने, गुन्हे तपास पथके तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची वाहनेही ये–जा करतात. तरीही या समस्येकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाशामुळे खड्डे दिसत नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि वाहनचालकांना अधिक त्रास सहन करावा लागतो. अनेक वाहनांचे नुकसान होत असून चाके खड्ड्यांमध्ये आदळल्याने वाहनांचे सुटे भाग खराब होण्याच्या घटनाही घडत आहेत.

पोलीस प्रशासनाने नगरपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभागाशी समन्वय साधून या प्रवेशद्वाराची आणि रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

पोलीस ठाण्यासारख्या महत्त्वाच्या शासकीय कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच खड्ड्यांचे साम्राज्य असणे हे प्रशासनाच्या अनास्थेचे प्रतीक असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## अहिल्यानगरमध्ये उद्या रंगणार 'मूड्स ऑफ किशोर' संगीतमय मैफिल!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतीय संगीतसृष्टीतील अवलिया आणि अष्टपैलू गायक किशोर कुमार यांच्या जयंतीचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात संगीताची भव्य पर्वणी आयोजित करण्यात आली आहे. 'ऋणानुबंध' आणि 'ए.एस.पी. क्रिएशन' यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता 'माऊली सभागृह' येथे ' लाईव्ह म्युझिक कॉन्सर्ट या विशेष सुश्राव्य मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी मोफत पासची व्यवस्था करण्यात आली असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक अजित रोकडे, सारिका रघुवंशी आणी प्रशांत बंडगर यांनी केले आहे.

किशोरदांच्या अफाट ऊर्जे ला, भावोत्कट सुरांना आणि त्यांच्या अष्टपैलू कलाप्रवासाला उजाळा देण्यासाठी या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. या सोहळ्यात पुण्यातील प्रसिद्ध गायक व 'व्हॉईस ऑफ किशोर कुमार' म्हणून सुपरिचित असलेले राजू काजे आणि सुप्रसिद्ध गायिका वैजू चांडवले आपल्या स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

या मैफिलीत अजित रोकडे, सारिका रघुवंशी, प्रशांत बंडगर, डॉ. शैलेंद्र खंडागळे, डॉ. दमन काशीद, डॉ. गायत्री काशीद, महेश घावटे, डॉ. विवेकानंद कंगे आणि नीना सावला हे गुणी गायक साथ देणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निवेदक प्रवीण पोतदार यांचे निवेदन असणार असून, ते गाण्यांसोबतच किशोरदांच्या आयुष्यातील विविध किस्से जिवंत करणार आहेत. अहिल्यानगरकरांनी या संगीतमय सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून गाण्यांच्या या भव्य आनंदाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन 'ऋणानुबंध' आणि 'ए.एस.पी. क्रिएशन' परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी चे मोफत पासेस स्वामी समर्थ मोबाईल शॉपी पारिजात चौक गुलमोहर रोड या ठिकाणी उपलब्ध आहेत. तेथे संपर्क करावा.

## नीटमध्ये ५९८ गुण मिळवल्याबद्दल प्रतीक खरमाटे, अल्फिया शेखचा कोटा एक्सलन्स सेंटरतर्फे गौरव

● **शेवगाव । वीरभूमी–**

वैद्यकीय प्रवेश परीक्षा (नीट) २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा कोटा एक्सलन्स सेंटरतर्फे सत्कार करण्यात आला. नीट परीक्षेत ५९८ गुण मिळवणारा विद्यार्थी प्रतीक खरमाटे तसेच 'अवेसीना मेडिकल युनिव्हर्सिटी'मध्ये एमबीबीएससाठी प्रवेश निश्चित झालेल्या गुणवंत विद्यार्थिनी अल्फिया शेख हिचे वडील निसार शेख यांचा यावेळी गौरव करण्यात आला.



■ छाया । अमोल कराळे

सत्कारानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रतीक खरमाटे याने आपल्या यशामागील सूत्र उलगडले. इयत्ता आठवीपासून बारावीपर्यंत कोटा एक्सलन्स सेंटरमध्ये शिक्षण घेतल्याचे सांगत तो म्हणाला, नियमित फाउंडेशन क्लासेस, आठवड्याला होणाऱ्या चाचणी परीक्षा, शंका निरसनासाठीची विशेष सत्रे आणि नियोजनबद्ध अभ्यासामुळे नीट परीक्षेची प्रभावी तयारी करता आली. योग्य वेळापत्रक, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वास हेच यशाचे प्रमुख आधार असल्याचे त्याने विद्यार्थ्यांना सांगितले.

अल्फिया शेख हिचे वडील निसार शेख यांनीही मनोगत व्यक्त करताना कोटा एक्सलन्स सेंटरच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनामुळेच अल्फियाला एमबीबीएस प्रवेशाचा मार्ग सुकर झाल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, शिस्त आणि सातत्य यांचा अंगीकार केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी नमूद केले. यावेळी पद्माकर खरमाटे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, विश्वस्त व मार्गदर्शिका हर्षदा काकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण बिटाळ, माध्यमिक शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, कोटा एक्सलन्स सेंटरचे विभाग प्रमुख हरीश खरड, डायरेक्टर उगले, अकॅडमिक डायरेक्टर शितल दहिवाळकर तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

समता काटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुन आभार मानले.

# पाथर्डीत पाठलाग करून छेडछाड करणाऱ्या तिघांविरुद्ध 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल

**धाडसी आईच्या प्रसंगावधानामुळे रोडरोमिओंचा पर्दाफाश । एकाला अटक, दोघांचा शोध सुरू**

● **पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील एका महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील अल्पवयीन विद्यार्थिनीचा सातत्याने पाठलाग करून तिची छेडछाड करणाऱ्या तिघांविरुद्ध पाथर्डी पोलिसांनी विनयभंग व 'पोक्सो' कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील एका आरोपीला पोलिसांनी अटक केली असून उर्वरित दोघांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तिघे तरुण विद्यार्थिनीचा मोटारसायकलवरून वारंवार पाठलाग करत होते. गुरुवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर विद्यार्थिनी बसस्थानकाकडे जात असताना विद्यालयासमोर आरोपींनी मोटारसायकल आडवी लावून तिच्याशी गैरवर्तन केले. तसेच कॅडबरीचे आमिष दाखवत त्रास दिला आणि विरोध केल्यास धमकीही दिल्याचा आरोप आहे.



■ छाया । अनिल खाटेर

या प्रकाराची माहिती मुलीने घरी दिल्यानंतर तिची आई सतर्क होती. घटनेच्या वेळी त्यांनी प्रसंगावधान राखत आरोपींना पकडण्याचा प्रयत्न केला. आरोपी मोटारसायकल घटनास्थळी सोडून पळून गेले. मातेने ती मोटारसायकल ताब्यात ठेवत तातडीने पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच दामिनी पथकाच्या पीएसआय रेवती भोसले, चालक रवींद्र चव्हाण व सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मोटारसायकल जप्त करून पीडित विद्यार्थिनी व तिच्या आईला पोलीस ठाण्यात आणले. त्यांच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध विनयभंग व 'पोक्सो' कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

मोटारसायकलच्या नोंदणी क्रमांकाच्या आधारे तपास करत पोलिसांनी एका आरोपीला वनदेव परिसरातून अटक केली. उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहेत.

### रोडरोमिओंवर कठोर कारवाईची मागणी

■ या घटनेनंतर शहरातील पालकांनी शाळा व महाविद्यालय परिसरात नियमित पोलीस गस्त वाढविण्याची मागणी केली आहे. मुलींची छेडछाड करणाऱ्या टवाळखोरांवर कठोर कारवाई करून शैक्षणिक परिसर सुरक्षित करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी




■ छाया । विद्याचंद्र सातपुते

● **अकोले । वीरभूमी–**

गुरुपौर्णिमेनिमित्त मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलमध्ये गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा सांस्कृतिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व पालकांची उत्सपूर्त उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या अल्फोंसा डी. होत्या. यावेळी ज्युनियर कॉलेजच्या विभागप्रमुख स्मिता पुंड, पर्यवेक्षक पराग सानप आणि पर्यवेक्षिका उषा हासे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुवंदना सादर करून गुरुजनांप्रती आदर व्यक्त केला. स्वामिनी शेटे, मिताली चौधरी, कल्पित खेडकर, साईश्री शेळके आणि सोपान गायकवाड यांनी गुरुंचे जीवनातील स्थान, शिक्षणाचे महत्त्व तसेच संस्कारांची भूमिका यावर प्रभावी मनोगते व्यक्त केली.

इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी वृंदा शेळके हिने सादर केलेल्या एकपात्री अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली, तर संगीत शिक्षक राम आहेर यांच्या सुमधुर गायनाने कार्यक्रमात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

यावेळी प्राचार्या अल्फोंसा डी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांचा सन्मान, संस्कार आणि ज्ञानाची कास धरणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने करण्यात आले.

# ‘गतीमान नागरी सेवा पुरस्कार’ प्रत्येक विभागाला मिळाला पाहिजे

## आ.आशुतोष काळे । कोपरगावात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न



छाया । जनार्दन जगताप

**कोपरगाव । वीरभूमी –** सर्वाभिमुख नेतृत्व असलेले अजितदादा आज आपल्यात नाहीत. त्यामुळे राज्याचे फार मोठे नुकसान झाले आहे. सातत्याने महाराष्ट्राच्या प्रगतीचा विचार करतांना त्यांची नेहमी अपेक्षा होती की, नागरिकांच्या अडचणी वेळेत सुटल्या पाहिजे आणि त्यासाठी आपले प्रशासन गतिमान असले पाहिजे. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ महायुती शासनाने त्यांच्या नावाने ‘गतिमान नागरी सेवा पुरस्कार’ देण्याचे जाहीर केले आहे. हा पुरस्कार प्रशासनातील प्रत्येक विभागाला मिळाला पाहिजे अशा पद्धतीने काम करा असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

कोपरगाव येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा जन्मदिवस व दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त शुक्रवार (दि.३१) रोजी कोपरगावात महात्मा गांधी प्रदर्शन चॅरीटेबल ट्रस्ट हॉल येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

आमदार आशुतोष काळे पुढे म्हणाले की, शासनाकडून नागरिकांना लाभाचे वितरण वेळेत झाले पाहिजे किंवा शासनाच्या माध्यमातून नागरीकांच्या ज्या काही अडचणी असतील त्या अडचणी वेळेत सुटल्या पाहिजे अशी अपेक्षा नेहमी स्व. अजितदादांची होती आणि हीच अपेक्षा राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांची पण आहे.स्व. अजितदादा हे हाडाचे शेतकरी आणि जनतेच्या प्रश्नांची सखोल जाण असलेले दूरदृष्टीचे नेतृत्व होते. शेती, दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री, भाजीपाला, साखर कारखाने, सहकारी बँका, पतसंस्था, दूध संस्था आणि मार्केट कमिट्यांपासून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक पैलूचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. त्याचबरोबर नगर विकास, ग्रामविकास, सहकार यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांवरील त्यांचे प्रभुत्व आणि शहरी विकासाविषयीची त्यांची दूरदृष्टी उल्लेखनीय होती. कामाच्या बाबतीत स्वत:शिस्तप्रिय असल्यामुळे प्रशासनेही शिस्त पाळून नागरीकांचे प्रश्न वेळेत सोडविले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे त्यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या गतिमान नागरी सेवा पुरस्काराचा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी उद्देश लक्षात घेवून नागरीकांना उत्कृष्ट सेवा देण्याचे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे अतिशय उत्कृष्ठ पणे काम सुरु आहे. राज्याचे महसूल मंत्री ना.चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी फेब्रुवारी महिन्यात सुरु केलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हे अभियान मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, पालकमंत्री ना. राधाकृष्णजी विखे पा.यांच्या संकल्पनेतून अतिशय यशस्वीपणे राबवीले जात आहे. लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या जास्तीत जास्त अडचणी कशा सोडवता येतील यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. प्रशासनाकडून जास्तीत जास्त काम मार्गी लावून घेण्याची जबाबदारी माझ्यावर आहे.त्यामुळे नागरीकांना केवळ शिबिराच्या दिवशीच गतिमान सेवा न देता वर्षभर प्रशासनाचे काम गतिमान कसे राहील यासाठी सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सामुहिक प्रयत्न करावे. आणि शासनाच्या सर्व लाभाच्या योजनांचा सगळ्यात जास्त लाभ कोपरगाव मतदार संघातील पात्र आणि गरजू नागरीकांना कसा मिळवून देता येईल यासाठी प्रयत्न करावे अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी अपर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे, तहसीलदार महेश सावंत, कोपरगाव शहर पोलीस निरीक्षक उद्धव डमाळे, गटविकास अधिकारी स्वप्निल वाळुंज, सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप दळवी, नगरपरिषद मुख्याधिकारी अजित निकत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी महेबूब शेख, नायब तहसीलदार सौ.प्रफुल्लिता सातपुते, चंद्रशेखर कुलथे, गटशिक्षणाधिकारी शबाना शेख, सहकारी संस्था सहाय्यक निबंधक संदीपकुमार रुद्राक्ष, भूमी अभिलेख उपअधीक्षक राजेंद्र खरोटे, बालविकास प्रकल्प अधिकारी रुपाली धुमाळ आदींसह सर्व विभागांचे शासकीय अधिकारी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन प्रवीणजी शिंदे, संचालक, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, लाभार्थी व नागरिक उपस्थित होते.

# कुकडीचे पाणी तातडीने शेतीसाठी व तलाव भरण्यासाठी सोडावे : नाना शिंदे

**श्रीगोंदा । वीरभूमी–** तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके करपण्याच्या मार्गावर असून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कुकडी प्रकल्पातून तातडीने शेतीसाठी पाणी सोडण्यात यावे, तसेच नदीपात्रातील साठवण बंधारे आणि तालुक्यातील तलाव भरावेत, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी केली आहे.



यासंदर्भात कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक २ चे कार्यकारी अभियंता घोरपडे यांना निवेदन देण्यात आले असून, आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनाही या मागणीची माहिती देण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी कुकडी प्रकल्पातील पाणीसाठा गेल्या वर्षाच्या तुलनेत अधिक असून काही धरणे शंभर टक्के भरली आहेत. मात्र, श्रीगोंदा तालुक्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने मका, बाजरी, सोयाबीन, उडीद, कापूस, ऊस, तूर, सूर्यफूल आदी पिकांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. वेळेवर पाणी उपलब्ध न झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

तालुक्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विशेष पुढाकार घेऊन शेतीसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच कार्यकारी अभियंता घोरपडे यांनी तातडीने नियोजन करून कुकडीचे पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, अशी मागणीही शिंदे यांनी केली आहे.

याशिवाय, श्रीगोंदा शहराची तहान भागविणारा लेंडीनाला तलाव, औटेवाडी तलाव तसेच तालुक्यातील विविध पाणीसाठा करणारे तलाव आणि नदीवरील साठवण बंधारे भरून घेण्यात यावेत, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

वेळेत पाणी उपलब्ध झाल्यास खरीप पिकांना मोठा दिलासा मिळेल, शेतकऱ्यांचे नुकसान टळेल आणि पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल, असा विश्वास नाना शिंदे यांनी व्यक्त केला.

# पाथर्डीत सनातन संस्थेचा गुरुपौर्णिमा महोत्सव उत्साहात

## साधना, नामजप आणि गुरुचरणांचा आश्रय घेण्याचे आवाहन । स्वसंरक्षण व धर्मशिक्षणावर भर




**पाथर्डी । वीरभूमी–** सनातन संस्थेच्या वतीने पाथर्डी येथील अतिथी मंगल कार्यालयात गुरुपौर्णिमा महोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी आगामी सामाजिक, राष्ट्रीय आणि आध्यात्मिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर साधना, नामजप आणि गुरुचरणांचा आश्रय घेण्याचे आवाहन करण्यात आले.

प्रमुख वक्त्या सौ. धनश्री शिंदे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जगासमोर उभ्या ठाकलेल्या विविध संकटांच्या पार्श्वभूमीवर समाजाला केवळ भौतिक उपायांनी दिलासा मिळणार नाही. प्रभू श्रीरामांच्या आदर्शांवर आधारित रामराज्य स्थापनेसाठी प्रत्येकाने साधना, नामजप आणि गुरुचरणांचा आश्रय घेणे आवश्यक आहे. तिसऱ्या महायुद्धाचे संभाव्य संकट, वाढती महागाई, बेरोजगारी, तणाव आणि नैराश्य या पार्श्वभूमीवर समाजाला आध्यात्मिक अधिष्ठानाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यंदा सनातन संस्थेच्या वतीने देशभरातील विविध भाषांमध्ये ८१ ठिकाणी गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, अहिल्यानगर जिल्ह्यात पाथर्डी येथे हा सोहळा उत्साहात पार पडल्याची माहिती त्यांनी दिली.

ॲड. नामदेव जायभाये यांनी मार्गदर्शन करताना राष्ट्र व धर्मरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सज्ज राहण्याचे आवाहन केले. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता प्रथमोपचार, अग्नीशमन आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. सनातन संस्थेचे साधक राष्ट्र आणि धर्मकार्याकरिता सातत्याने कार्यरत असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री व्यासपूजन तसेच प.पू. भक्तराज महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर सनातन संस्था आणि संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या कार्यावर आधारित माहितीपट प्रदर्शित करण्यात आला. त्यांच्या संदेशाचे वाचनही करण्यात आले.

महोत्सवात महिला व युवकांसाठी स्वसंरक्षणाच्या सोप्या तंत्रांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. तसेच रामराज्य स्थापनेसाठीचा संकल्प आणि सामूहिक नामजप भावपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमस्थळी धर्मशिक्षणपर माहिती देणारे विविध फलक तसेच आयुर्वेदीय वनस्पतींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. उपस्थितांनी प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध विषयांची माहिती घेतली.

# वीरगावात १,५०० वृक्षांचे वृक्षारोपण

## आनंदगड शैक्षणिक संकुल, ग्रामपंचायत व रोटरी क्लबचा संयुक्त उपक्रम । पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**अकोले । वीरभूमी–** अकोले तालुक्यातील वीरगाव येथे आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, ग्रामपंचायत वीरगाव आणि रोटरी क्लब अकोले सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने भवानी माता मंदिर परिसरातील डोंगरावर वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरण संरक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने आनंदगड शैक्षणिक संकुलातर्फे दरवर्षी वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात येतो. यंदाही विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.


छाया । विद्याचंद्र सातपुते

या उपक्रमासाठी रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे पर्यावरण संचालक संदीप मालुंजकर यांनी स्वखर्चातून १,५०० वृक्षरोपे उपलब्ध करून दिली. तसेच आनंदगड परिसरासाठी ५० वडाच्या रोपांचे योगदान देण्याचा संकल्पही त्यांनी केला.

यावेळी आनंदगड शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष तथा अमृतसागर दूध संघाचे उपाध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे, उपसरपंच जयवंत थोरात, ग्रामसेविका नेहे मॅडम, रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे अध्यक्ष गंगाराम करवर, पर्यावरण संचालक संदीप मालुंजकर, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर प्रा. विद्याचंद्र सातपुते, संचालक अनिल देशमुख, शिवराज वाकचौरे, प्राचार्य किरण चौधरी, प्रा. संदीप थोरात, सुपरवायझर अलका आहेर, पिंगला तोरमल, लक्ष्मण कवडे, गणेश अस्वले, गणेश कुमकर, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास चारोडे, विवेक शेटे, ग्रामपंचायत वीरगावचे गणेश कुमकर, श्री. रासने, गव्हाणे मॅडम, सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. वृक्षारोपणानंतर या सर्व रोपांचे संगोपन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत वीरगावने स्वीकारली असून त्याबद्दल ग्रामस्थांकडून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.

वृक्षारोपणानंतर विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वनभोजनाचा आनंद घेत निसर्गरम्य वातावरणाचा आस्वादही घेतला.

# गुरुपौर्णिमेनिमित्त नवनाथ विद्यालयात वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**अहिल्यानगर । वीरभूमी–** गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करणे, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणे आणि हरित भविष्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

नवनाथ विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव सुमन कुरेल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, आप्पासाहेब कदम, तेजस केदारी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सुमन कुरेल म्हणाल्या की, गुरुपौर्णिमा हा आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या दिवशी वृक्षारोपण करून निसर्गाप्रती आपली जबाबदारी पार पाडणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. पर्यावरणाचे संरक्षण केल्याशिवाय भावी पिढीचे सुरक्षित भविष्य घडू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, वृक्ष हेच जीवनाचे खरे आधार आहेत. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि कमी होत जाणारी हरित संपदा लक्षात घेता वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनालाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेमाची भावना रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून, प्रत्येकाने लावलेले झाड जगविण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.